**<u>असुधारित प्रत</u>**

# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## मंगळवार, दिनांक १३ डिसेंबर, २०१६

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.**

(१) **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** : "सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा अकरावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(२) **उद्योग मंत्री** : "महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अग्निशमन सेवेतील कर्मचाऱ्यांच्या सेवा किंवा कर्मचाऱ्यांच्या नोकरीस महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षा अधिनियम, २०११ कलम (२) च्या खंड (क) उप खंड (६) मधील तरतुदीनुसार अत्यावश्यक सेवा म्हणून जाहिर केल्याबाबत प्रसिध्द करण्यात आलेली अधिसूचना क्र. आयडीसी-२०१५/प्र.क्र.२६७(एक)/उद्योग - १४ दिनांकित १८ ऑक्टोबर, २०१६" सभागृहासमोर ठेवतील.

(३) **सामाजिक न्याय मंत्री** : "महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित" व उपकंपनी "शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ मर्यादित" यांचे सन २०१४-२०१५ या वर्षाचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : "लोकलेखा समितीचा "चौदावा" व "पंधरावा" अहवाल सादर करणे."**

**चार : (क) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — असल्यास.**

**(ख) म.वि.प.नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने — असल्यास.**

**पाच : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) -**

(१) **(शुक्रवार, दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना) —**
**सर्वश्री. संजय दत्त,** हेमंत टकले, धनंजय मुंडे, नरेंद्र पाटील, ॲड. निरंजन

डावखरे, श्री. किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. रामराव वडकुते, अशोक ऊर्फ भाई जगताप, शरद रणपिसे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबईतील फोर्ट येथील बॉम्बे हाऊसमध्ये टाटा समुहाच्या सुरक्षारक्षकांनी 'मिड डे' चे ज्येष्ठ फोटोग्राफर अतुल कांबळे, 'टाइम्स ऑफ इंडिया' चे शांतकुमार आणि 'हिदुस्थान टाइम्स' चे हरजित सिंह या वृत्तपत्रकार छायाचित्राकारांना मारहाण केल्याचा प्रकार दिनांक ४ नोव्हेंबर, २०१६ च्यासुमारास उजेडात येणे राज्यातील पत्रकारांवरील वाढते हल्ले, पत्रकारांवर खोटे गुन्हे दाखल करुन हितसंबंधियांकडून त्यांची मुस्कटदाबी करण्याचा सातत्याने होत असलेला प्रयत्न आणि ज्येष्ठ पत्रकारांना पेन्शन देण्यास शासनाकडून होत असलेली टाळाटाळ यामुळे दिनांक २ ऑक्टोबर, २०१६ रोजी पत्रकारांतर्फे राज्यभर मूक मोर्चा काढण्यात येणे, राज्यात पत्रकारांवर हल्ला व धक्काबुकी करण्याचे प्रकार वाढत असून मागील काही अधिवेशनात यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला असता पत्रकारांवर होणारे हल्ले व त्यांच्या इतर विविध मागण्या तातडीने सोडविण्यात येतील असे आश्वासन शासनाने दिलेले असणे, परंतु सदर आश्वासनाची अंमलबजावणी करण्यात शासनाला येत असलेले अपयश, पत्रकारांना हक्काचे घर मिळावे, संरक्षण मिळावे, विमा योजना लागू करावी अशा विविध मागण्या प्रलंबित असणे, पत्रकार राज्यात जनजागृतीची महत्वाची भूमिका बजावत असताना जीव धोक्यात घालत असणे, त्यांच्या संरक्षणाकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे पत्रकारांमध्ये शासनाबाबत तीव्र असंतोष निर्माण होणे, शासनाने महाराष्ट्रातील पत्रकारांना हक्कांचे घर मिळावे, संरक्षण मिळावे, विमा योजना लागू करावी याबाबत तातडीने निर्णय घेऊन पत्रकारांच्या समस्या सोडविण्यासाठी करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री. नारायण राणे,** संजय दत्त, हेमंत टकले, धनंजय मुंडे, नरेंद्र पाटील, ॲड. निरंजन डावखरे, श्री. किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. रामराव वडकुते, अशोक ऊर्फ भाई जगताप, शरद रणपिसे, रामहरी रुपनवर, प्रा. जोगेन्द्र कवाडे, श्री. जनार्दन चांदूरकर **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

अहमदनगर जिल्ह्यातील कोपर्डी येथील बलात्काराच्या घटनेचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्रात पसरले असतानाच नगर तालुक्यात (जि.अहमदनगर) येथे पुन्हा एकदा वाकोडी गावात दिनांक ३० सप्टेंबर, २०१६ रोजी दुपारी शेळ्या चारण्यास जाणाऱ्या मुलीवर लखन कांबळे व त्याचा साथीदार यांनी शेतात नेऊन बलात्कार केल्याची उघडकीस आलेली भयंकर घटना, याबाबत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येऊनही कारवाई न होणे, जिल्ह्यात

गेल्या दोन महिन्यात तब्बल ५ बलात्काराच्या घटना घडलेल्या असणे, यामुळे या जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था दिवसेंदिवस ढासळत असल्याचे निदर्शनास येऊनही गुन्हेगारांवर कारवाई करण्यास पोलीसांचे होत असलेले दुर्लक्ष, तसेच मुंबईतील अंधेरी भागातील आंबोली परिसरात एका विवाहित महिलेवर दिनांक १ नोव्हेंबर, २०१६ रोजी सामूहिक बलात्कार केल्याची घटना घडणे, सदरील घटना ताजी असतानाच एका गतिमंद मुलीचे अपहरण करुन बलात्कार करण्यात आल्याची खळबळजनक घटना मालाड मार्वे परिसरात दिनांक ३ नोव्हेंबर, २०१६ रोजी घडणे, मार्वे परिसरातील अनेक लॉज आणि कॉटेजमध्ये अश्लील चाळे चालत असल्याची स्थानिकांद्वारे तक्रार करण्यात येणे, या तक्रारीवरुन या मुलीला कॉटेजमध्ये आठ दिवस कोंडल्याची बाब उघड होणे, तसेच विक्रोळी येथील पार्कसाईट परिसरात दोन वर्षीय मुलीवर विकृत नराधमाने बलात्कार केल्याचा प्रकार समोर आलेला असणे, तसेच नागपूर येथे निरी संस्थेतील एका सेवानिवृत्त वैज्ञानिकाने दत्तक घेतलेल्या तीन अल्पवयीन मुलीचे एका व्यक्तीने लैंगिक शोषण केले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ दरम्यान निदर्शनास येणे, याशिवाय नागपूरमधील कोंढाळी येथील एका अल्पसंख्याक समाजातील एका मुलीला एका विवाहीत व्यक्तीने फूस लावून पळविले व तीन दिवस डांबून ठेऊन लैंगिक शोषण केल्याचे उघड होणे, तसेच वर्धा जिल्ह्यातील गोपुरी येथील शासकीय निरीक्षणगृह व बालसुधारगृहातील दोन अल्पवयीन मुलांचे काळजीवाहकाने लैंगिक शोषण केल्याचा संतापजनक व विकृत प्रकार उघडकीस आला असणे, असे गुन्हे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करुनही गुन्हेगारांवर कोणतीच कडक कारवाई होत नसणे, राज्यात दररोज महिला व अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार होत असतानाही याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी जनमानसात निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, त्यामुळे शासनाने महिला व बालकांवरील लैंगिक अत्याचार रोखण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

(३) **श्री. रविंद्र फाटक**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील कोपरी ३६, कळवा १७५, लोकमान्यनगर-सावरकरनगर ७८, माजिवडा ७६, प्रभाग क्र.६३, ६४ व ६५ मध्ये ८१० मुंब्रा ५२०, नौपाडा २६९, उथळसर ११२, वर्तकनगर ११२ व वागळे १३९ या प्रमाणे प्रभागानुसार सर्व्हे करून एकूण २५४३ धोकादायक व अतिधोकादायक इमारती असल्याचा अहवाल ठाणे महानगरपालिकेमार्फत शासनास सादर करण्यात येणे, ठाणे महानगरपालिकेतर्फे सदर जीर्ण

इमारतीत राहणाऱ्या रहिवाश्यांना इमारती खाली करण्याच्या नोटीसा देण्यात येणे, अन्य ठिकाणी राहण्याची सोय नसल्याने सदर जीर्ण इमारतीत राहणारे लाखो लोक जीव मुठीत धरून दिवस काढत असणे, जीर्ण झालेल्या काही इमारती पावसाळ्यात कोसळून जीवित हानी होणे, धोकादायक इमारतीमधील रहिवाश्यांचे पुनर्वसन सुरक्षित ठिकाणी करण्याची रहिवाश्यांची मागणी असणे, ठाणे शहरात क्लस्टर योजना शासनाने मंजूर करणे, सदर योजनेची ठाणे शहरात अद्यापही अंमलबजावणी न होणे, अंमलबजावणीस विलंब होत असल्याने जनतेत पसरलेला असंतोष, क्लस्टर योजना त्वरीत अंमलात आणण्याची आवश्यकता, शासनाने यासंदर्भात करावयाची कार्यवाही शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री. हेमंत टकले,** धनंजय मुंडे, नरेंद्र पाटील, ॲड. निरंजन डावखरे,श्री. किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. रामराव वडकुते, सुनिल तटकरे, सतिश चव्हाण, प्रकाश गजभिये, ख्वाजा बेग, आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात विशेषत: विदर्भात कापूस, सोयाबीन नंतर विदर्भातले दुसरे पीक ज्वारी, ही पिके काढणीच्या हंगामात माहे सप्टेंबर दरम्यान आलेल्या परतीच्या पावसामुळे ज्वारी पिकांवर विपरित परिणाम होऊन ती काळी पडणे, तसेच सोयाबीन आणि ज्वारी पिकांचा दर नित्याने घसरत चालल्याने शेतकऱ्यांची होत असलेली आर्थिक हानी, ज्वारीचा रंग काळा पडल्यामुळे तसेच सोयाबीनचा रंग हिरवा तांबडा झाल्यामुळे शेतकऱ्यांना कमी भावात विकावे लागणे, शेतकऱ्यांना उत्पादना एवढा खर्च सुध्दा न मिळणे, त्यामुळे त्यांच्यात पसरलेले चिंतेचे वातावरण, याबाबत सर्व्हे करुन मदत देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **श्री. सुनिल तटकरे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"रोहा हे रायगड जिल्ह्यातील एक प्रमुख शहर असणे, औद्योगिकीकरण व नागरीकरणामुळे शहरामध्ये दिवसेंदिवस लोकसंख्या वाढत असणे, रोहा-अष्टमी नगरपरिषदेस दिडशे वर्ष पूर्ण झालेली असणे, वाढीव शहरीकरणामुळे रोहा व अष्टमी दरम्यान कुंडलिका नदीवर सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पूलाचे बांधकाम सुरु असणे, सदरचा पूल हा राज्य मार्ग क्र. ९३ वरील महत्वाचा पूल असणे, सद्य:स्थितीत रोहा व अष्टमी यांना जोडणाऱ्या जुन्या पूलावरुन वाहतूक सुरु असणे, सदरचा जुना

पूलही जिर्णावस्थेत असणे, महाड सारख्या दुर्घटनेनंतर सुध्दा शासनाने या पूलाच्या दुरुस्तीकडे लक्ष न देणे व नवीन पूलाचे बांधकाम अर्धवट ठेवणे, नवीन पूलाच्या दोन्ही बाजूच्या जोडणी राहील्याने सदरचा पूल वाहतुकीसाठी उपयोगात न येणे, संबंधित कंत्राटदाराने या बाबतीत अक्षम्य दुर्लक्ष केल्यानेच सदरचा पूल वाहतुकीसाठी उपलब्ध होत नसणे, जुलै-ऑगस्ट २०१६ दरम्यान झालेल्या अतिवृष्टीचा अवेळी पावसाने रोहा व अष्टमीचा तुटलेला संपर्क, या पार्श्वभूमीवर स्थानिक नागरीकांनी नवीन पूल त्वरीत सुरु होण्याविषयी वेळोवेळी केलेली मागणी या कडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे स्थानिकांमध्ये पसरलेला प्रचंड असंतोष, या गंभीर बाबीकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची त्वरीत कार्यवाही व उपाययोजना."

(६) **सर्वश्री. अमरसिंह पंडित,** धनंजय मुंडे, सुनिल तटकरे, सतिश चव्हाण, जयवंतराव जाधव, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **कृषी मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"रासायनिक कीड नाशकाप्रती प्रतिकार शक्ती विकसित होण्याच्या किडीमधील नैसर्गिक गुणधर्मामुळे बी.टी.कपाशी मध्ये बोंड अळी आणि इतर रोगांचा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव होणे, बी.टी. कपाशीच्या बियाण्यामधील डेल्टा इंडो टोक्झीन या विषाबद्दल किडीमध्ये प्रतिकार क्षमता वाढल्यामुळे त्यावर अनेक रोगांचा प्रादुर्भाव होणे, बी.टी.बियाणे खरेदी करताना या पिकावर रोग पडणार नाहीत असे गृहीत धरून शेतकरी अधिकची किंमत मोजून महागडे बियाणे खरेदी करीत असणे, संबधित संशोधनाच्या पेटेंटसाठी शेतकऱ्यांच्या खिशातून पैसा जाणे, अशा पिकांवर रोगांचा प्रादुर्भाव वाढल्यामुळे शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे आर्थिक नुकसान होणे, यामुळे दुष्काळग्रस्त शेतकरी अधिकच आर्थिक संकटात सापडणे, राज्यात बी.टी. बियाणांच्या सुधारित वाण निर्मितीसाठी संशोधनाची गरज निर्माण होणे, कृषी विद्यापीठ आणि कृषी संशोधन केंद्राकडून अशा बियाण्यांच्या संशोधनासाठी कोणतीही कार्यवाही न होणे, यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असणे, शेतकऱ्यांना वाजवी दारात अत्याधुनिक संशोधित वाण उपलब्ध करण्याची मागणी लोकप्रतीनिधिंनी शासनाकडे करणे, या मागणीकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे शेतकऱ्यांमध्ये पसरलेला शासन विरोधी तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही आणि शासन प्रतिक्रिया."

(७) **प्रा. अनिल सोले,** सर्वश्री. मितेश भांगडिया, गिरीशचंद्र व्यास, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **ऊर्जा मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नागपूर शहराला वीज पुरवठा करण्याकरीता म.रा.वि.वि. कंपनीने (स्पॅन्को) एस.एन.डी.एल. सोबत करार करून सन २०११ पासून शहराला वीज पुरवठा करण्यात येणे, सदर एस.एन.डी.एल कंपनीबाबत मोठ्या प्रमाणात ग्राहकांच्या तक्रारी प्राप्त होणे, सदर कंपनीने २६६ कोटीची गुंतवणूक केल्याचा दावा केला जाणे, परंतु प्रत्यक्षात मात्र ६० कोटींची गुंतवणूक असल्याचे उघड होणे, त्यातच एस.एन.डी.एल कडून नागरीकांना निकृष्ठ सेवा दिली जात असून वीज मिटर वेगाने फिरत असल्याने ग्राहकांच्या मोठ्या प्रमाणात तक्रारी दाखल होणे, सप्टेंबर, २०१५ च्या अहवालात एस.एन.डी.एल. ला दोशी ठरविण्यात येणे, याबाबत मा. पालकमंत्री यांनी १२ फिडरवरील मीटरची तपासणी करून योग्य पध्दतीचे मिटर लावण्याची तंबी देऊनही त्यात कोणतीही सुधारणा न होणे, त्यामुळे नागपूर शहरात वीज ग्राहकांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत असणे, परंतु सदर एस.एन.डी.एल कंपनीवर कोणतीही कारवाई केली न जाणे, त्यामुळे शहरातील नागरीकांमध्ये निर्माण झालेला असंतोष, शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, शासनाने यावर तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(८)** **सर्वश्री. दत्तात्रय सावंत,** श्रीकांत देशपांडे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **सामाजिक न्याय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील सामाजिक न्याय विभागामार्फत भटक्या विमुक्त जमाती मध्ये आश्रम शाळा चालविण्यात येणे, या आश्रम शाळांमधून विद्यार्थी संख्येअभावी शिक्षक अतिरिक्त ठरणे, या अतिरिक्त शिक्षकांना काम नाही, तर वेतन नाही अशा शासन आदेश निर्गमित करण्यात आलेल्या, आदेश विरोधात आश्रम शाळा संघटनांनी उच्च न्यायालयाकडे धाव घेणे, विविध आंदोलने, मोर्चा यांचे आयोजन करणे, मा उच्च न्यायालयाने या अतिरिक्त शिक्षकांना तात्काळ वेतन देण्याचे आदेश शासनास देणे,या आदेशान्वये शासनाने दिनांक १७ ऑक्टोबर २०१६ रोजी या अतिरिक्त शिक्षकांचे वेतन अदा करण्याचे आदेश देणे व त्यासाठी निधीची उपलब्धता करणे, त्या अन्वये राज्यातील भटक्या जमाती आश्रम शाळामधील शिक्षकांचे थकीत वेतन सुरु करणे, परंतु सोलापूर जिल्ह्यातील समाजकल्याण अधिकारी यांच्या उदासीनतेमुळे सोलापूर जिल्ह्यातील आश्रम शाळेतील अतिरिक्त शिक्षकांचे वेतन न होणे, लोकप्रतिनिंधीनी व शिक्षक संघटनांनी संबंधितांचे वेतन होण्यासाठी मागणी करणे, निधी खर्च न झाल्याने शासनाकडून उपलब्ध झालेला निधी दुसरीकडे वापरण्यात येणे, यामुळे शिक्षकांना आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**सहा : म.वि.प. नियम १०१ - अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).**

**सात : सन २०१६-२०१७ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा (पहिला दिवस.)**

खालील मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होईल.

१. महसूल, मदत व पुनर्वसन कार्य, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री.

२. वित्त व नियोजन, वने मंत्री.

३. ग्रामविकास, महिला व बाल विकास मंत्री.

४. आदिवासी विकास मंत्री.

५. कृषी, फलोत्पादन मंत्री.

६. पर्यावरण मंत्री.

७. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री.

८. जलसंधारण, राजशिष्टाचार मंत्री.

९. रोजगार हमी योजना, पर्यटन मंत्री.

१०. सहकार, पणन व वस्त्रोद्योग मंत्री.

११. पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री.

## - मध्यंतर -

**आठ : शासकीय विधेयके -**

**(क) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

**(१) "सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ४७ - महाराष्ट्र खनिज विकास (निर्मिती व उपयोजन) निधी (निरसन) विधेयक, २०१६"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ४७ - महाराष्ट्र खनिज विकास (निर्मिती व उपयोजन) निधी (निरसन) विधेयक, २०१६ विधानपरिषदेच्या १० सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **सहा महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ

पाठविण्यात यावे."

---

(२) **"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ४८ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (पाचवी सुधारणा) विधेयक, २०१६"**
**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ४८ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (पाचवी सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेच्या १० सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **सहा महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(ख) **विधानसभेने सुधारणांसह दुसऱ्यांदा संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

(१) **"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक २६ - महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१६"**

(२) **"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक २७ - महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१६"**

(३) **"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ३२ - महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण विधेयक, २०१६"**

(४) **"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक २५ - महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा) विधेयक, २०१६"**

(५) **"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक २८ - मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१६"**

---

**नऊ : (क) (शुक्रवार, दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) — (अनुक्रमांक (क) व (ख)) -**

**सर्वश्री.धनंजय मुंडे,** शरद रणपिसे, सुनिल तटकरे, नारायण राणे, जयंत पाटील, हेमंत टकले, संजय दत्त, अमरसिंह पंडित, अशोक ऊर्फ भाई जगताप, कपिल पाटील, सतिश चव्हाण, अनिल भोसले, ॲड.जनार्दन चांदुरकर, ॲड.निरंजन डावखरे, आर्कि.अनंत गाडगीळ, सर्वश्री. नरेंद्र पाटील, रामहरी रुपनवर, ख्वाजा बेग, जयवंतराव जाधव, श्रीमती हुस्नबानु खलिफे, श्री.जगन्नाथ शिंदे, प्रा.जोगेंद्र कवाडे, सर्वश्री.प्रकाश गजभिये, रामराव

वडकुते, अब्दुल्लाखान दुर्राणी, आनंद ठाकुर ॲड.राहुल नार्वेकर, श्री.जयदेव गायकवाड, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. रामहरी रुपनवर, अमरनाथ राजूरकर, मोहनराव कदम, अमरिशभाई पटेल, चंद्रकांत रघुवंशी, सुभाष झाबंड, हरिसिंग राठोड, आनंदराव पाटील, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव — (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर) -**

"राज्यात प्रामुख्याने बहुसंख्येने आणि शेतीवर अवलंबून असलेल्या मराठा समाजाची शैक्षणिक व आर्थिक स्थिती कमालीची खालावलेली असणे, राज्यात सातत्याने पडत असलेल्या दुष्काळामुळे प्रामुख्याने शेतीवर अवलंबून असलेला हा समाज स्थित्यंतराच्या प्रक्रियेतून जात असणे, समाजातील युवकांना उच्च शिक्षण तसेच नोकरीची संधी उपलब्ध न होणे, आरक्षण नसल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना शैक्षणिक संधी गमाविण्याची वेळ येणे, त्यामुळे त्यांच्या बेरोजगारीच्या प्रश्नाने गंभीर स्वरुप धारण केलेले असणे, यामुळे मराठा समाजाच्या युवकांमध्ये नैराश्य व संतापाची भावना निर्माण होणे, या पार्श्वभूमीवर राज्याच्या जिल्ह्याजिल्ह्यात मराठा समाजाचे आरक्षणासह विविध मागण्यांसाठी अतिशय शिस्तबध्द पध्दतीने लाखोंच्या संख्येने मूक मोर्चे निघत असणे, मोर्चात युवक, युवती, महिला व ज्येष्ठ नागरिकांची संख्या लक्षणीय असणे, मोर्चाच्या प्रतिनिधींकडून जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाकडे मागण्यांचे स्वयंस्पष्ट निवेदन सादर होऊन त्यावर शासनाकडून तातडीची कार्यवाही न होणे, राज्यातील सर्वात मोठा समाज घटक स्वत:च्या न्यायहक्कासाठी शांततेच्या मार्गाने आंदोलने करीत असताना सरकारकडून त्याची कोणतीही दखल घेण्यात न येणे, त्याचबरोबर मुस्लिम, धनगर, लिंगायत समाजाने आरक्षणाच्या मागणीसाठी राज्यभर तीव्र आंदोलन छेडणे, त्यामुळे या सर्व समाजात निर्माण झालेला तीव्र असंतोष, राज्यातील मराठा व मुस्लिम समाजाला यापूर्वीच्या आघाडी शासनाने लागू केलेले आरक्षण पुर्ववत लागू करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनेकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष व हलगर्जीपणा, मराठा, मुस्लिम व धनगर समाजाला शैक्षणिक आरक्षणासह त्यांच्या इतर मागण्यांबाबतही निर्णय घेण्यासाठी करावयाची कार्यवाही."

(ख) **श्री.प्रविण दरेकर,** डॉ.नीलम गोऱ्हे, विनायक मेटे, श्रीमती स्मिता वाघ, सर्वश्री.गोपीकिसन बाजोरिया, सुजितसिंह ठाकूर, रविंद्र फाटक, प्रा.अनिल सोले, सर्वश्री.गिरीश व्यास, प्रशांत परिचारक, डॉ.अपूर्व हिरे, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव — (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर) -**

"महाराष्ट्रामध्ये बहुसंख्येने असणाऱ्या मराठा समाजाची अनेक वर्षापासून आरक्षणाची मागणी असणे, परंतु या मागणीकडे सातत्याने दुर्लक्ष

होणे, मराठा समाजाला १६ टक्के आरक्षण देण्याच्या निर्णयाला उच्च न्यायालयात स्थगिती मिळणे, उच्च न्यायालयात मराठा आरक्षणाची बाजू भक्कमपणे मांडण्यासाठी पुरावे व सांख्यिकी माहिती गोळा करण्यासाठी मराठा आरक्षण समिती गठीत करणे, महाराष्ट्रभर जिल्ह्या-जिल्ह्यात मराठा समाजाचे प्रचंड शांततापूर्ण, शिस्तबध्द, मूक क्रांती मोर्चे निघणे, प्रस्थापित मराठा नेतृत्वाकडून झालेल्या अन्यायाविरोधातील आपल्या भावना ह्या मोर्च्यातून व्यक्त होणे, राज्य शासनाने आर्थिकदृष्ट्या मागास वर्गाची उत्पन्न मर्यादा ६ लाखापर्यंत वाढविली असणे, तसेच सर्व आर्थिक दुर्बल घटकांसाठी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना व डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना सुरू करणे, याशिवाय अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या माध्यमातून स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करणे, कोपर्डी प्रकरणातील अत्याचार लक्षात घेता सदर प्रकरण जलदगतीने न्यायालयात चालवून पिडीत महिलेला न्याय देण्याचा प्रयत्न करणे, मराठा समाजाच्या भावना लक्षात घेऊन शासनाने सुरू केलेल्या योजना व त्यावरील जनतेची असणारी प्रतिक्रिया विचारात घेण्यात यावी."

(ग) **डॉ.नीलम गोऱ्हे,** प्रा.अनिल सोले, सर्वश्री.गोपिकिसन बाजोरिया, गिरीशचंद्र व्यास, ॲड.अनिल परब, मितेश भांगडिया, रविंद्र फाटक, डॉ.परिणय फुके, विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रविण दरेकर, तानाजी सावंत, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव** -

"विदर्भातील जलसंपदाचे अपूर्ण प्रकल्प, अनुशेषांतर्गत प्रकल्प, झुडपी जंगलामुळे अडलेले प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी पर्यावरणदृष्ट्या असलेले अडसर दूर करणे,भूसंपादन व पुर्नवसनाच्या कामाची गती वाढवून पुरेसा निधी उपलब्ध करणे, जलवितरण व लाभक्षेत्र विकास अंतर्गत प्रत्येक महामंडळात स्वतंत्र यंत्रणा निर्माण करणे, कालव्याऐवजी पाईपलाईनने सिंचन करणे, सर्व प्रकल्पांना सुप्रमा घेणे, पाणी वापर संस्था, उपसा सिंचन संस्था बळकट करुन शेतकऱ्यांना जलसक्षम करणे, पिण्याचे पाणी, औद्योगिक व कृषी वापराचे पाणी यांचे नियोजन करणे, गोदावरी व तापी खोरे जलनियोजन आराखडा तयार करणे, वैणगंगा व नळगंगा जोडप्रकल्प आणि कन्हान-वर्धा बोगद्याद्वारे नदीजोड प्रकल्पाचा अभ्यास करुन ते तातडीने कार्यान्वित करणे, नागपूरातील मेट्रो रेल्वे व मिहान प्रकल्पाच्या कामातील प्रगती, विदर्भातील नगरपालिकांना हगणदारीमुक्त करणे, भुयारी गटार योजना, भूपृष्ठावरील पेयजल व्यवस्थापन, अंतर्गत रस्ते विकास, खुल्या जागा व विकास क्षेत्रामधील जागा संरक्षित करणे, उद्यान निर्मिती व नदी परिसर यांचा विकास करुन स्मार्ट शहर करण्याकडे शासनाचा असलेला रोख, पंतप्रधान आवास योजना ब व क वर्ग नगरपालिका क्षेत्रामध्ये कार्यान्वित करणे, वन पर्यटन

उद्यान, जंगल सफारी, वन संशोधन, बांबु व वन उत्पादनामधून रोजगार निर्मिती करण्यात शासनाने अग्रेसर राहणे, मुंबईतील उपकरप्राप्त व मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुर्नविकास जलद गतीने करण्याच्या दृष्टीने प्रशासनिक व तांत्रिक मंजुरीचे निकष सुलभ व शिथिल करण्याची आवश्यकता, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान परिसरातील झोपडपट्टीधारकांचे स्थलांतर करुन तेथील जमिनीचे भूसंपादन व तेथील सर्व्हे नं. २३९ वरील जमिनीची पुनर्मोजणी करण्याबाबत लोकप्रतिनिधी व स्वयंसेवी संस्थांकडून होत असलेली मागणी, आरे वसाहतीतील आदिवासी व पात्र झोपडपट्टीधारकांची समस्या व त्यांचे पुनर्वसन, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही विचारात घेण्यात यावी."

**दहा : अर्धा-तास चर्चा – म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) -**

(१) **श्री.जयवंतराव जाधव, वि.प.स.**

"**येवल्याच्या मुक्तीभूमीला ब वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा मिळणेबाबत**" या विषयावरील श्री.जयवंतराव जाधव, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक २३६१२ ला दिनांक ६ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

(२) **श्री.आनंद ठाकूर, वि.प.स.**

"**पडघा (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील विद्युत प्रकल्पासाठी जमिनी संपादित केलेल्या प्रकल्पग्रस्तांना नोकरीत सामावून घेण्याबाबत**" या विषयावरील श्री.आनंद ठाकूर व इतर वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक २१३०९ ला दिनांक १९ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन,**
**नागपूर,**
**दिनांक : ९ डिसेंबर, २०१६.**

**उत्तमसिंग चव्हाण,**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**